# शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांची वाचनाची सवय: एक अध्ययन

**प्रा.डॉ. संजय फुलझेले**
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
आष्टी.जिल्हा गडचिरोली.442605.
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.(म.रा.)
sanjayfylzele11@gmail.com
9834772654

**सारांश:**

गडचिरोली जिल्हा अतिदुर्गम, नक्षल प्रभावित आणि साक्षरतेचे प्रमाण कमी असलेला जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखला जातो. संशोधकांनी संशोधन कार्य पूर्ण करीत असताना गडचिरोली येथील "शिवाजी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वाचनाची सवय" या विषयाची निवड करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय कशा पद्धतीने ओळखली जाईल याविषयी विचार मंथन करून संशोधकाने विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात आले. पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांचा वाचनाच्या सवयींमध्ये प्रमाण हे 67% दिसून येते.तर पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय ही सरासरी 85% दिसून येते. यावरून प्रस्तुत संशोधन लेख पूर्ण करीत असताना असे स्पष्ट होते की, पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय ही कमी प्रमाणात दिसून येते. तर पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय त्यापेक्षा अधिक प्रमाणात दिसून येते. त्याच प्रमाणे पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय ही फक्त पाठ्यक्रम पुस्तके वाचन करण्यावर अधिक भर दिसून येते. तर पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये अवांतर पुस्तकांचं वाचन, स्पर्धा परीक्षा इतरही संसाधनाचा वापर करताना दिसून येतात.

**बीज संज्ञा** – उपभोक्ता , पदव्युत्तर, पदवी

**प्रस्तावना:**

गडचिरोली जिल्हा अतिदुर्गम अतिमागास नक्षलग्रस्त साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या जिल्ह्याची निर्मिती 26 ऑगस्ट 1982 मध्ये झाली गडचिरोली जिल्ह्यातील अतिमागास दुर्बल तथा आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुले करून उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मुख्य उद्देशाने शिवाजी महाविद्यालयाची स्थापना 1960 या वर्षी झाली त्याच उद्देशाने विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके सोबत संदर्भ ग्रंथ, चरित्र, अवांतर ग्रंथ साठा, नियतकालिके, संशोधन पत्रिका वृत्तपत्र इत्यादी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध व्हावी याच उदात्त हेतूने जिल्हा स्तरावर भव्य दिव्य असे महाविद्यालयाचे ग्रंथालय उपलब्ध आहे. ग्रंथालयात ग्रंथ संपदा 34 हजार 740 इतकी आहे. महाविद्यालय पदवी बी.ए. बी.कॉम पदवीत्तर एम काम अभ्यासक्रम चालवले जातात एकुण विद्यार्थी संख्या ही अठराशे 36 इतकी आहे यामध्ये संशोधकाने पदवी अंतिम वर्षाचे विद्यार्थी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांची वाचनाची सवय या विषयावर संशोधन लेख पूर्ण करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली त्यामध्ये पदवी स्तरावरील 112 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आणि पदव्युत्तर स्तरावरील 58 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आले वरील संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी म्हणून ग्रंथालय विविध उपक्रम राबविले जातात संशोधकाने शिवाजी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा वाचनाची सवय या विषयावर संशोधन लेख लिहून विद्यार्थ्यात कोणकोणत्या संशोधनात अधिक वाचनाची आवड आहे त्यांच्या वाचनाची सवय काय आहे याविषयीचे संशोधन करीत असताना ग्रंथालय दिल्या जाणाऱ्या सेवांचे अवलोकन करता येईल अशा प्रकारचे संशोधक आज वरील शीर्षकावरून लक्षात येईल.

**विषयाचे महत्त्व:**

शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वाचनाचे सवय लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करत असताना ग्रंथालयातील कोणकोणत्या संसाधनाचा वापर करतात आणि आणि इतर परीक्षा करिता कोणत्या संसाधनाचा वापर करून विद्यार्थी आपली आवड पूर्ण करतात हे लक्षात घेण्याकरिता संशोधकाने विषयाची निवड केलेली लक्षात येते.

**संशोधन क्षेत्र:**

संशोधकाने वरील संशोधन लेखन पूर्ण करीत असताना संशोधन क्षेत्र हे शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथील पदवी व पदव्युत्तर घरावरील विद्यार्थ्यांची वाचनाची सवय एक अभ्यास या विषयाची निवड करण्यात आली.

**संशोधनाचे उद्देश :**

1 .ग्रंथालयात वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास करणे.

2. विद्या विद्यार्थ्यांच्या वाचनाची सवय जाणून घेणे.

3. विद्यार्थी वाचन करताना कोणत्या संसाधनाचा वापर करतात किती वेळ ग्रंथालयामध्ये खर्ची घालतात.

**गृहितके:**

1.सर्व विद्यार्थ्यांची वाचनाची सवय चांगली आहे.

2.विद्यार्थी अभसक्रम पूर्ण करण्यासाठी इतर ग्रंथाचा वापर करताना दिसून येत आहेत..

**संशोधन पद्धती:**

संशोधकाला संशोधन पूर्ण करीत असताना प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. त्यामध्ये प्राथमिक माहिती संकलन करीत असताना प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात आले. दुय्यम माहिती संकलनात पुस्तके, वृत्तपत्रे, संपादकीय लेख, नियतकालिके, शोध पत्रिका. शासकीय o`RRk तसेच इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात आले संशोधकाला प्रत्यक्ष माहिती संकलित करीत असताना प्रश्नावली पद्धतीचा अवलंब करून संशोधकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप करण्यात आले त्यामध्ये पदवी स्तरावरील 112 उपभोक्त्यांना आणि पदव्युत्तर स्तरावरील 53 उपभोक्त्यांना प्रश्नावली वाटप करण्यात आले प्रश्नावली वाटप केल्यानंतर पदवी स्तरावरील 78 आणि पदव्युत्तर स्तरावरील 41 उपभोगत्याने प्रश्नावली प्रत्यक्ष सहभाग दर्शवून उत्तरकर्त्यांनी प्रश्नावली भरून दिले आहे वरील प्रश्नावली ची टक्केवारी ही 72 टक्के आहे

**विश्लेषण आणि माहिती संकलन :**

संशोधकाला संशोधन लेख पूर्ण करीत असताना संशोधकांनी शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांची वाचनाची सवय एक अध्ययन या विषयावर माहिती संकलन करीत असताना एकूण उपभोक्ता संख्याही 72 टक्के आहे पदवी स्तरावरील उपभोग त्यांची संख्या 78 असून त्यांची टक्केवारी ही एकोणसत्तर पॉईंट 64 टक्के आहे पदव्युत्तर स्तरावरील उपभोग त्यांची संख्या 41 असून त्यांची टक्केवारी 77 टक्के आहे

**सारणी क्रमांक.01**


विद्यार्थ्यांचे वाचनाची सवय

| अ.क. | विद्यार्थी | प्रतिसाद | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 01. | पदवी | 52 | 66.66% |
| 02 | पदवीत्तर | 35 | 85% |

Volume - 2 (2022)
Issue - 1 (August)

LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science

ISSN
2583-2549





वरील सारणी मध्ये महाविद्यालयातील पदवी स्तरावर आम्ही पदव्युत्तर स्तरावरील उपभोक्ता ची संख्या लक्षात घेता पदवी स्तरावरील 78 उपभोग त्यापैकी 52 उपभोक्ता मध्ये वाचनाची सवय दिसून येते. त्यांची टक्केवारी ही 66.66% आहे. तर पदवीत्तर स्तरावरील 41 उपभोग त्यापैकी 35 उपभोक्ता मध्ये वाचनाची सवय दिसून येते, त्यांची टक्केवारी हे 85 टक्के आहे.

वरील सारणी वरून संशोधकास असे निदर्शनास येते की, पदवी स्तरावरील उपभोग त्यापेक्षा पदव्युत्तर स्तरावरील उपभोग त्यामध्ये वाचनाची सवय अधिक प्रमाणात दिसून येते.

**सारणी क्रमांक : 02**

विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथ इतर साहित्याचा वापर

| अ. कं | विद्यार्थी | उपभोक्ता | प्रतिसाद | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | संख्या | | |
| 01 | पदवी | 78 | 47 | 60% |
| 02 | पदवीत्तर | 41 | 38 | 83% |




महाविद्यालयातील पदवी स्तरावरील 78 उपभोक्ता पैकी 47 उपभोक्ता मध्ये ग्रंथालयातील अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक पेक्षा इतर ग्रंथसाहित्य वापर करताना दिसून येतात त्यांचे प्रमाण हे 60% दिसून येते तर पदव्युत्तर स्तरावरील 41 उपभोक्ता पैकी 38 उपभोक्ते अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर ग्रंथ साहित्याचा वापर करताना दिसून येतात त्यांची टक्केवारी ही 83 % आहे.

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की पदवी स्तरावरील उपभोगत्यापैकी पदव्युत्तर स्तरावरील उपभोक्त्या मध्ये अभ्यासक्रम पाठ्यपुस्तका पेक्षा इतर ग्रंथ साहित्याचा वापर करताना दिसून येतात.

**सारणी क्रमांक : 03**

ग्रंथालय भेटीची वारंवारिता

| अ.क. | प्रतिसाद | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | दैनंदिन | 56 | 47.05% |
| 02 | साप्ताहिक | 38 | 38.93% |
| 03 | महिने | 16 | 13.44% |
| 04 | कधीही नाही | 19 | 17.56% |
| | एकूण | 119 | 100% |

वरील lkj.kho#.k भरून संशोधकास असे स्पष्ट होते की, महाविद्यालयातील व त्यांचे ग्रंथालयात दैनंदिन भेटी देण्याचे प्रमाण 47.5 % दिसून येते. साप्ताहिक भेटी देण्याचे प्रमाण हे 31.3 % दिसून येते. महिन्यामध्ये भेटी देणार याचे प्रमाण हे 13. 44 % आहे. तर कधी भेटणार देणार याचे प्रमाण 17.5 % आहे.

वरील सारण यावरून असे स्पष्ट होते की, दैनंदिन भेटी देणाऱ्या च प्रमाण हे जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे उपभोक्त्याचे वाचनाची आवड लक्षात येते.

**उपाय योजना:**

1. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना उद्बोधन कार्यशाळा आयोजन करणे.
2. ग्रंथालयातील उपलब्ध कर्मचाऱ्यांना अद्यावत ज्ञानाने अवगत करणे.
3. ग्रंथालयात विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने संसाधन साहित्याचा साठा वाढविण्यावर भर देणे.
4. महाविद्यालय स्तरावर ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करणे.

**निष्कर्ष:**

गडचिरोली जिल्ह्यातील "शिवाजी महाविद्यालय येथील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांचे वाचनाची सवय: एक अध्ययन या विषयावर संशोधन लेख पूर्ण करीत असताना संशोधकाला असे लक्षात आले की, गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थी या ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये शिक्षण घेण्याकरिता आलेला आहे.आणि तो महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना ग्रंथालयातील उपलब्ध संसाधनाचा वापर करीत असताना पदवी स्तरावरील विद्यार्थी हे अभ्यासक्रमावरील पाठ्यपुस्तकांचाच वापर जास्त प्रमाणात करताना दिसून येत आहेत. पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी है पाठ्यक्रमा व्यतिरिक्त ग्रंथालयातील इतर संसाधनाचा वापर करताना दिसून येतात. यावरून असे स्पष्ट होते की, पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना ग्रंथालय विषयी जागृकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, उद्बोधन वर्ग, ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करणे. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून ग्रंथालयातील इतर संसाधनाचा वापर करून त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. फडके. ना,सी."ग्रंथालय व माहितीशास्त्र" फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2. "वाचनाची सवय आणि आवड निर्माण करणे,"ज्ञानगंगोत्री, य.च.म. मुक्त विद्यापीठ,नाशिक.
3. कराडे. बी..एम, " सामाजिक संशोधन पद्धती"पिंपळापुरे प्रकाशन महाल, नागपुर.